पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी,पुणे - ४११ ०१८

# जाहीर निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील गट अ ते क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी, वर्तमानपत्रात जाहिरात क्र.१२६५/२०२१ प्रसिध्द करुन दिनांक ३०/१२/२०२१ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. सदर जाहिरातीमधील अट क्र. ३.१ मध्ये अर्ज करणेकरीता उमेदवारांची कमाल वयोमर्यादा कळविलेली आहे.

तथापि महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एसआव्ही-२०२१/ प्र.क्र.६१/कार्या १२, तारीख १७ डिसेंबर,२०२१ अन्वये कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जाहिरातीनुसार परिक्षेला बसण्यासाठी संधी देण्याबाबत निर्णय झालेला आहे. सदरचे निर्णयानुसार कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय सेवेत सरळसेवेने नियुक्ती संदर्भात दि.०१ मार्च २०२० पासून जाहिराती प्रसिध्द न झालेमुळे नियुक्तीकरिता विहीत केलेली कमाल वयोमर्यादा ज्या उमेदवारांनी ओलांडलेली आहे अशा उमेदवारांना दि.३१/१२/२०२२ पर्यंत वयोमर्यादेची अट शिथील करुन ज्या जाहिराती प्रसिध्द होतील त्या जाहिरातीसाठी **"एक वेळची विशेष बाब"** म्हणून परिक्षेस बसण्याची संधी देण्यात आलेली आहे.

सबब पिंपरी चिंचवड मनपामार्फत प्रसिध्द केलेल्या जाहिरात क्र.१२६५/२०२१ मधील अट क्र.३.१ मध्ये उमेदवारांना अर्ज करणेसाठी कळविणेत आलेल्या कमाल वयोमर्यादेमध्ये वरील शासन निर्णयानुसार दि.०१ मार्च २०२० ते दि.१७/१२/२०२१ या कालावधीत ज्या उमेदवारांने कमाल वयोमर्यादा ओलांडलेली आहे. अशा उमेदवारांसाठी अर्ज सादर करण्याकरिता एक वेळची विशेष बाब म्हणून परवानगी देणेत येत आहे. त्याप्रमाणे उमेदवारांनी नोद घेऊन विहीत मुदतीत अर्ज सादर करावेत.

24/12/21

आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

क्रमांक - प्रशा/१/कावि/११७२/२०२१
दिनांक २४/१२/२०२१